# नागरिकांची सनद

## राज्य आरोग्य हमी सोसायटी

जीवनदायी भवन, राज्य कामगार विमा योजना रुग्णालय आवार,
गणपत जाधव मार्ग,वरळी, मुंबई ४०० ०१८

दुरध्वनी क्रमांक- ०२२- २४९९ ९२०३/०४/०५

Website:- www.jeevandayee.gov.in

# प्रस्तावना

दि.१.०४.२०२० पासून राज्यात एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना राज्यात सुधारित स्वरुपात राबविण्यात येत आहे. या योजनेव्दारे निवडक तज्ञ सेवांमधील उपचारांसाठी अंगीकृत रुग्णालयांत दाखल होण्यापासून ते रुग्णालयातून सुट्टी होईपर्यंत रोख रक्कमरहीत दर्जेदार वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन दिली जाते. ही योजना विमा व हमी या मिश्र प्रकारे राबविली जात आहेत. त्याकरिता लाभार्थ्यांना युनायटेड इंडिया इन्श्युरन्स कंपनीकडून विमा तत्त्वावर व राज्य आरोग्य हमी सोसायटीव्दारे हमी तत्त्वावर आरोग्य संरक्षण दिले जात आहे.

दि.२८ जुलै,२०२३ च्या शासन निर्णयान्वये महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत – प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचे विस्तारीकरण करण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे. सदर विस्तारीत योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता आवश्यक प्रशासकीय कार्यवाही प्रगतीत आहे.

एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या दोन्ही योजनांची सर्व सामान्य नागरिकांना माहिती प्राप्त व्हावी याकरिता राज्य आरोग्य हमी सोसायटीमार्फत नागरिकांची सनद प्रसिध्द करण्यात येत आहे. ही नागरिकांची सनद सर्व सामान्य नागरिकांसाठी नेहमीच खुली असेल आणि सन्माननीय नागरिकांच्या बहुमुल्य सुचनांचा विचार करुन या सनदेमध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात येतील. राज्य आरोग्य हमी सोसायटी नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी करण्यास नेहमी कटीबध्द आहे.

रमेश चव्हाण, भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी,
राज्य आरोग्य हमी सोसायटी

# राज्य आरोग्य हमी सोसायटी

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखाली राज्य आरोग्य हमी सोसायटी कार्यरत आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाकडील शासन निर्णय क्र.मफुयो-२०१६/प्र.क्र.३३१/आरोग्य-६, दि.१२ ऑगस्ट,२०१६ अन्वये सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट,१८६० (१६८० चा अधिनियम क्र.२१) च्या तरतुदीनुसार, 'राज्य आरोग्य हमी सोसायटी' स्थापन करण्यास व सदर अधिनियमातील तरतुदीनुसार पंजीबध्द करण्यास मान्यता देण्यात आली. या निर्देशानुसार, **'राज्य आरोग्य हमी सोसायटी'** पंजीबध्द करण्यात आली आहे.

राज्य आरोग्य हमी सोसायटीमार्फत एकत्रित आयुष्मान भारत – प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना राबविली जात आहे.

**राज्य आरोग्य हमी सोसायटीची रचना –** सदर सोसायटीचे राज्य आरोग्य हमी सोसायटीचे दैनंदिन प्रशासकीय कामकाज तसेच अधिपत्याखालील योजनांचे नियंत्रण व नियमन मुख्य कार्यकारी अधिकारी पाहतात. मुख्य कार्यकारी अधिकारी हे अखिल भारतीय सेवेतील अधिकारी आहेत. त्यांना सहाय्य करण्याकरिता मुख्यालय स्तरावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी, वित्तीय सल्लागार व सहाय्यक संचालक (आरोग्य सेवा) हे प्रतिनियुक्तीवरील शासकीय अधिकारी तसेच अन्य कंत्राटी अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत. त्याचप्रमाणे क्षेत्रीय स्तरावर क्षेत्रीय व्यवस्थापक व जिल्हा स्तरावर जिल्हा समन्वयक यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना – सर्वसाधारण माहिती

**योजनेची उद्दिष्टे –** आयुष्मान भारत – प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना चे उद्दिष्ट आपत्तीजनक आरोग्यावरील खर्च कमी करणे, दर्जेदार आरोग्य सेवेची उपलब्धता सुधारणे, अपूर्ण वैद्यकीय गरजा कमी करणे आणि योजनेंतर्गत पात्र कुटुंबांचा आरोग्यसेवा खर्च कमी करणे हे आहे. या पात्र लाभार्थी कुटुंबांना दुय्यम, तृतीय आणि डे-केअर प्रक्रियेसाठी (लागू असल्यास) रोग आणि वैद्यकीय परिस्थितींच्या उपचारांसाठी अंगीकृत केलेल्या रुग्णालयांच्या जाळयामार्फत (NWH) आरोग्य कवच प्रदान करणे.

**महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना** : महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना ही महाराष्ट्र शासनाची महत्त्वाकांक्षी आरोग्य विमा योजना आहे. योजनेंतर्गत निवडक आजारांवर शासकीय व खाजगी अंगीकृत रुग्णालयांच्या जाळयामार्फत पात्र शिधापत्रिकाधारक व अन्य लाभार्थी गटांना नि:शुल्क वैद्यकीय सेवा पुरविण्यात येत आहेत. ही योजना दि.२ जुलै,२०१२ पासून आठ जिल्हयांत लागू करण्यात आली होती. त्यांनतर दि.२१ नोव्हेंबर,२०१३ पासून ही योजना महाराष्ट्रातील उर्वरीत २८ जिल्हयांमध्ये विस्तारीत करण्यात आली होती.

**आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना**: आयुष्मान भारत – प्रधानमंत्री जन आरोग्य योजना ही भारत सरकारची आरोग्य विमा योजना असून दि.२३ सप्टेंबर,२०१८ पासून राज्यात लागू करण्यात आली. सदर योजना राज्यात महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेसोबत एकत्रितरित्या सुरु करण्यात आली. ही योजना विमा आणि हमी तत्त्वावर राबविण्यात येत आहे.

दि.१.०४.२०२० पासून एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना राज्यात सुधारित स्वरुपात राबविण्यात येत आहे. सदर योजना नि:शुल्क व विनाकागद संगणक प्रणालीवर राबविण्यात येत आहेत.

**लाभार्थी:**

**१) महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेतील लाभार्थी:**

| गट | लाभार्थ्यांचा तपशील |
|---|---|
| गट अ | पिवळी, केशरी, अंत्योदय अन्न योजना व अन्नपुर्णा शिधापत्रिकाधारक कुटुंबे |
| गट ब | अवर्षणग्रस्त १४ जिल्हयातील (औरंगाबाद, जालना, बीड, परभणी, हिंगोली, लातूर, नांदेड, उस्मानाबाद, अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशिम, यवतमाळ व वर्धा) शुभ्र शिधापत्रिकाधारक शेतकरी कुटुंबे |
| गट क | १. शासकीय अनाथाश्रमातील मुले,<br>२. शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थी,<br>३. शासकीय महिला आश्रमातील महिला,<br>४. शासकीय वृध्दाश्रमातील जेष्ठ नागरिक<br>५. माहिती व जनसंपर्क कार्यालयाकडील निकषानुसार पत्रकार व त्यांचेवर अवलंबित असलेले कुटुंबातील सदस्य.<br>६. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदणी जिवित बांधकाम कामगार व त्यांची कुटुंबे |

- ❖ दिनांक ३ एप्रिल २०२३ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती जिल्ह्यांतील महाराष्ट्र शासनाने दावा केलेल्या ८६५ मराठी भाषिक गावांतील नागरिकांसाठी महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना लागू करण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे. त्यानुसार कर्नाटक सीमा भागातील बेळगांव, कारवार, कलबुर्गी व बिदर जिल्हयांतील १२ तहसीलमधील ८६५ गावांतील १)अंत्योदय अन्न योजना, २) प्राधान्य गटातील कुटुंबे व ३) अन्नपुर्णा शिधापत्रिकाधारक कुटुंबांचा महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना समावेश आहे.

**२) प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचे लाभार्थी:**

आयुष्मान भारत – प्रधानमंत्री जन आरोग्य योजनामध्ये सुरुवातीला सामाजिक, आर्थिक व जातनिहाय जनगणना २०११ मध्ये नोंदीत कुटुंबांचा लाभार्थी म्हणून समावेश होता. तथापि राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाकडील दि.१ फेब्रुवारी,२०२२ व दि.१ सप्टेंबर, २०२२ च्या आदेशास अनुसरुन राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमाच्या डाटामधून अंत्योदय आणि प्राधान्य गटातील शिधापत्रिकाधारक कुटुंबांचा काही निकषांच्या आधारे सदर योजनेत समावेश केलेला आहे.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमाच्या डाटामधून अंत्योदय योजनेमध्ये समाविष्ट सर्व कुटुंबांचा प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेमध्ये समावेश करण्यात आला आहे. तसेच प्राधान्य गटामधून ३ किंवा त्यापेक्षा जास्त महिला असलेले कुटुंब व १ किंवा त्यापेक्षा जास्त जेष्ठ नागरिक असलेले कुटुंब अशा केशरी शिधापत्रिकाधारक कुटुंबांची निवड योजनेचे लाभार्थी म्हणून करण्यात आली आहे.

**लाभार्थ्यांची ओळख:**

| | |
|---|---|
| महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना | गट अ – पिवळी/केशरी शिधापत्रिका व फोटो ओळखपत्र<br>गट ब – ७/१२ उतारा व शुभ्र शिधापत्रिका आणि फोटो ओळखपत्र<br>गट क – संबंधित संस्थेचे ओळखपत्र व फोटो ओळखपत्र |
| आयुष्मान भारत – प्रधानमंत्री जन आरोग्य योजना | आयुष्मान कार्ड व फोटो ओळखपत्र |

पात्रता निकषाच्या कागदपत्रासोबत स्विकारण्यात येणाऱ्या वैध फोटो ओळखपत्रांची यादी:

| | | | |
|---|---|---|---|
| पॅन कार्ड | वाहनचालक परवाना | मतदार ओळखपत्र | दिव्यांग प्रमाणपत्र |
| शाळा/कॉलेज ओळखपत्र | पासपोर्ट | स्वातंत्र्य सैनिक ओळखपत्र | रा.गां.जी.आ.योजनेचे ओळखपत्र |
| आधार कार्ड / लाभार्थ्याच्या फोटोसह आधार नोंदणीपत्र | | फोटोसह राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक | |
| केंद्र शासन/ राज्य शासनाने निर्गमित केलेले जेष्ठ नागरिक ओळखपत्र | | सैनिक कल्याण बोर्डाकडून वितरीत केलेले सैन्यदलातील माजी कर्मचारी असल्याचे प्रमाणपत्र | |
| सागरी मच्छिमार असल्याचे ओळखपत्र (कृषी/ मत्स्यव्यवसाय विभाग महाराष्ट्र शासन यांची वितरीत केलेले) | | राज्य शासन/ केंद्र शासनाने वितरीत केलेले अन्य कोणतेही ओळखपत्र | |
| ओळखपत्राचा पुरावा म्हणून आधार कार्डचा आग्रह धरण्यात येईल आणि आधार कार्ड/ क्रमांक उपलब्ध नसल्यास, आधार कार्ड तयार करण्यासाठी स्विकारण्यात येणाऱ्या कागदपत्रांपैकी कोणतेही कागदपत्र स्विकारण्यात येतील. | | | |

**लाभार्थी कुटुंब संख्या:** एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत – प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत विमा तत्त्वावर एकूण २.२२ कोटी कुटुंबांचा समावेश आहे. त्यापैकी ९३.०५ लक्ष कुटुंबे आयुष्मान भारत – प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेमध्ये समाविष्ट असून १.२९ कोटी कुटुंबे महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेची लाभार्थी आहेत. त्याचप्रमाणे महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेमध्ये हमी तत्त्वावर अंदाजे ६.५२ लक्ष कुटुंबे समाविष्ट आहेत.

## वार्षिक विमा संरक्षण मर्यादा:

**महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना (MJPJAY)::**

१. ९९६ उपचारांकरिता प्रति कुटुंब प्रति कुटुंब ₹१,५०,०००/- पर्यंतचे तर मुत्रपिंड प्रत्यारोपणासाठी ₹२,५०,०००/- विमा संरक्षण अनुज्ञेय.
२. कुटुंबांतील एक किंवा सर्व सदस्य उक्त मर्यादेत लाभ घेऊ शकतात.

**आयुष्मान भारत – प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (AB-PMJAY):**

१. १२०९ उपचारांकरिता प्रति कुटुंब प्रति वर्ष ₹५ लक्षापर्यंत आरोग्य कवच.
२. देशातील कोणत्याही राज्यातील अंगीकृत रुग्णालयात उपचार घेण्याची सुविधा.
३. कुटुंबांतील एक किंवा सर्व सदस्य उक्त मर्यादेत लाभ घेऊ शकतात.
४. ₹ १.५ लक्षापर्यंचे विमा संरक्षण विमा कंपनीमार्फत तर ₹ १.५ लक्षापुढील ते ₹ ५ लक्षापर्यंतचे कवच राज्य आरोग्य हमी सोसायटीमार्फत हमी तत्त्वावर पुरविण्यात येते.

**विमा संरक्षण कालावधी व विमा दर:** युनायटेड इंडिया इन्श्युरन्स कंपनी या सार्वजनिक क्षेत्रातील विमा कंपनीमार्फत दोन्ही योजनेतील एकसमान असणाऱ्या ९९६ उपचारांकरिता प्रति कुटुंब प्रति वर्ष रु.१.५० लक्ष रकमेपर्यंतचे आरोग्य विमा संरक्षण पुरविले जात आहे. सदर कंपनीस लाभार्थी कुटुंबांच्या वतीने राज्य आरोग्य हमी सोसायटीकडून त्रैमासिक हप्त्यांमध्ये विमा रक्कम अदा करीत आहे.

| **कालावधी** | **प्रति कुटुंब प्रति वर्ष विमा संरक्षण रक्कम** |
|---|---|
| ०१.०४.२०२० ते ३१.०३.२०२३ (मुळ करार कालावधी) | रु.७९७/- |
| ०१.०४.२०२३ ते ३१.०३.२०२४ (मुदतवाढ) | रु.८५५/- |
| ०१.०४.२०४ ते ३०.०६.२०२४ (मुदतवाढ) | रु.१०५०/- |

**उपचारांचा समावेश:**

- एकत्रित योजनेंतर्गत अंगीकृत रुग्णालयांमध्ये निवडक ३४ विशेष सेवा प्रकारांतर्गत शस्त्रक्रिया व चिकित्सा यावरील नि:शुल्क उपचार.
- महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेमध्ये ९९६ शस्त्रक्रिया/चिकित्सा/उपचार आणि १२१ शस्त्रक्रिया पश्चात सेवांचा समावेश.
- प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत १२०९ शस्त्रक्रिया/चिकित्सा/उपचार (म.ज्यो.फु.ज.आ. योजनेतील ९९६ उपचार +अतिरिक्त २१३ उपचार) समाविष्ट असून यामध्ये १८३ (म.ज्यो.फु.ज.आ. योजनेतील १२१ सेवा + अतिरिक्त ६२ सेवा) शस्त्रक्रिया पश्चात सेवांचा (follow up packages)अंतर्भाव.

| अ.क्र. | विशेष सेवा प्रकार | अ.क्र. | विशेष सेवा प्रकार |
|---|---|---|---|
| १ | जळीत | २ | ह्दयरोग |
| ३ | ह्दयरोग शस्त्रक्रिया व उपचार | ४ | आकस्मिक सेवा |
| ५ | त्वचारोग | ६ | अंत:स्त्राव संस्थेचे विकार |
| ७ | कान, नाक व घसा रोग | ८ | सर्वसाधारण औषधशास्त्र चिकित्सा |
| ९ | सर्वसाधारण शस्त्रक्रिया | १० | रक्तविकार |
| ११ | संसर्गजन्य आजार | १२ | इंटरव्हेन्शनल रेडिओलॉजी |
| १३ | जठरांत्रमार्गाचे रोग | १४ | कर्करोगावरील औषधोपचार |
| १५ | नवजात व बालरोग वैद्यकीय व्यवस्थापन | १६ | मुत्रपिंड विकार |
| १७ | मज्जातंतूचे विकार | १८ | मज्जातंतूच्या विकारावरील शस्त्रक्रिया |
| १९ | स्त्री रोग व प्रसुती शास्त्र | २० | नेत्ररोग शस्त्रक्रिया |
| २१ | अस्थिव्यंग शस्त्रक्रिया | २२ | बालरोग शस्त्रक्रिया |
| २३ | बालरोग कर्करोग | २४ | प्लास्टीक सर्जरी |
| २५ | आस्कमिक वैद्यकीय उपचार | २६ | कृत्रिम अवयव उपचार |
| २७ | फुफ्फुसाच्या आजारावरील उपचार | २८ | किरणोत्सर्गाव्दारे कर्करोग चिकित्सा |
| २९ | संधिवात सबंधी उपचार | ३० | जठर व आंत्र विकाराच्या शस्त्रक्रिया |
| ३१ | कर्करोगाच्या शस्त्रक्रिया | ३२ | मुत्रवह संस्थेच्या विकारांवरील शस्त्रक्रिया |
| ३३ | मानसिक आजार | ३४ | जबडा व चेहऱ्याच्या अस्थींवरील शस्त्रक्रिया |

- शस्त्रक्रिया व उपचारांची यादी व त्यांचे पॅकेज दर - www.jeevandayee.gov.in >operational guidelines वर उपलब्ध.

- एकत्रित योजनेतील ९९६ उपचारांपैकी १३१ उपचार आणि केवळ प्र.मं.ज.आ. योजनेच्या २१३ उपचारांपैकी ३७ उपचार केवळ शासकीय रुग्णालयांसाठी राखीव.
- समाविष्ट सेवा :
  - सर्वसाधारण वॉर्डमधील खाटाचे शुल्क
  - परिचारिका शुल्क,
  - विशेषज्ञ, भूलतज्ञ व वैद्यकीय अधिकारी यांचे शुल्क
  - तपासणी शुल्क, भुल, ऑक्सीजन, ऑपरेशन थिअटर व अतिदक्षता शुल्क
  - शस्त्रक्रियेसाठी लागणाऱ्या साहित्याची किंमत
  - औषधे व द्रव्ये, कृत्रिम अवयवाची किंमत, रक्त संक्रमणाचे दर (राज्य शासनाच्या धोरणानुसार रक्त पुरविणे),
  - इन्प्लॉट, एक्स-रे व निदान चाचण्या
  - आंतररुग्णास भोजन, डिस्पोजेबल व कन्झुन्मेबल
  - राज्य परिवहनाच्या दरानुसार किंवा रेल्वेच्या व्दितीय श्रेणी भाडे यानुसार वाहतुक खर्च (रुग्णालय ते रुग्णाचे निवासापर्यंत)
  - उपचारादरम्यान काही गुंतागुंत झाल्यास त्यासह संपुर्ण खर्चाचा अंतर्भाव
  - रुग्णाचा मृत्यू झाला तर रुग्णाचा मृतदेह रुग्णालयातून घरापर्यंत घेऊन जाण्याचा खर्च समाविष्ट.

## अंगीकृत रुग्णालये:

- अंगीकृत रुग्णालयांची कमाल संख्या - १०००
- सद्यस्थितीत अंगीकृत रुग्णालये - ९९७ (दि.१८.०४.२०२४ पर्यंत)
- शासकीय अंगीकृत रुग्णालये — १९६
- खाजगी अंगीकृत रुग्णालये — ८०१
- रुग्णालयातील संबंधित व्यक्ती — आरोग्यमित्र
- अंगीकृत रुग्णालयांच्या अधिक माहितीसाठी - www.jeevandayee.gov.in > Network Hospitals
- अंगीकरणाकरिता - www.jeevandayee.gov.in > Hospitals>Hospital Empanelment Request

## योजनेंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या सेवा व कालमर्यादा:

| अ.क्र. | सेवा | कालमर्यादा |
|---|---|---|
| १ | योजनेंतर्गत नाव नोंदणी | १ तास |
| २ | उपचार/शस्त्रक्रियेस पुर्वमान्यता | १२ तास |
| ३ | आपत्कालीन परिस्थितीत उपचारांकरिता पुर्वमान्यता | तात्काळ |
| ४ | योजनेसंदर्भात कॉल सेंटरव्दारे माहिती | तात्काळ |

**टोल फ्री कॉल सेंटर क्रमांक:**

१) महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना - १५५ ३८८ अथवा १८०० २३३ २२००

२) आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य - १४५५५ अथवा १८०० १११ ५६५

## क्षेत्रीय कार्यान्वयन:

- क्षेत्रीय स्तरावर क्षेत्रीय व्यवस्थापक व प्रत्येक जिल्हयात जिल्हा समन्वयक कार्यरत.
- www.jeevandayee.gov.in >staff directory येथे संपर्क तपशील उपलब्ध.

## विविध समित्या:

| समितीचे नाव | अध्यक्ष | सदस्य सचिव | संबंधित शासन निर्णय |
|---|---|---|---|
| नियामक परिषद | मा. मुख्यमंत्री | मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमीसोसायटी | मफुयो-२०२३/ प्र.क्र.९९/ आरोग्य-६, दि.२३ मार्च,२०२३ |
| राज्य सनियंत्रण व कार्यकारी समिती | अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग | उपमुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमीसोसायटी | रास्वयो-२०१८/ प्र.क्र.७४/ आरोग्य-६, दि.२६ फेब्रुवारी,२०१९ |
| समन्वय, अंगीकरण व शिस्तपालन समिती | मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमीसोसायटी | सहाय्यक संचालक (आरोग्य सेवा), राज्य आरोग्य हमीसोसायटी | रास्वयो-२०१८/ प्र.क्र.७४/ आरोग्य-६, दि.२६ फेब्रुवारी,२०१९ |
| अंतिम दावे निराकरण समिती (सेंट्रल क्लेम कमिटी) | मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमीसोसायटी | सहाय्यक संचालक (आरोग्य सेवा), राज्य आरोग्य हमीसोसायटी | रास्वयो-२०१८/ प्र.क्र.७४/ आरोग्य-६, दि.२६ फेब्रुवारी,२०१९ |
| राज्य तक्रार निवारण समिती | मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमीसोसायटी | उपमुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमीसोसायटी | रास्वयो-२०१८/ प्र.क्र.७४/ आरोग्य-६, दि.२६ फेब्रुवारी,२०१९ |
| जिल्हा सनियंत्रण व तक्रार निवारण समिती | जिल्हाधिकारी | जिल्हा शल्य चिकित्सक | रास्वयो-२०१८/ प्र.क्र.७४/ आरोग्य-६, दि.२६ फेब्रुवारी,२०१९ |

## विद्यमान योजनेचे विस्तारीकरण:

दि.२८ जुलै,२०२३ च्या शासन निर्णयान्वये महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत – प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचे विस्तारीकरण करण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे. त्यानुसार महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेतील लाभार्थ्यांचे आरोग्य कवच रु.१.५० लक्ष रुपयांवरुन रु.५ लक्षपर्यंत वाढणार आहे तसेच सदर योजना राज्यातील सर्व शिधापत्रिकाधारक व अधिवास प्रमाणपत्रधारक कुटुंबांना लागू होणार आहे. या एकत्रित योजनेत लाभार्थ्यांना १३५६ उपचारांचा लाभ अनुज्ञेय असेल. विस्तारीत योजनेच्या अंमलबजावणीकरिता आवश्यक प्रशासकीय कार्यवाही प्रगतीत आहे. सदरहू कार्यवाही झाल्यावर विस्तारीत योजना राज्यात लागू होईल.

--------------------------------